पोलीस अधीक्षक,पालघर

माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४(१) (ख) (१) अन्वये माहिती कलम ४ (१) (ख) (१)

१	**कार्यालयाचे नाव**	पोलीस अधीक्षक,पालघर
२	**कार्यालयाचा पत्ता**	प्लॉट क्र.०१,सेक्टर - १५, कोळगाव, नवनगर,पालघर, जिल्हा - पालघर (पश्चिम) पिन कोड - ४०१ ४०४
३	**पोलीस अधीक्षक**	श्री.बाळासाहेब पाटील
४	**कोणत्या खात्यांर्गत कार्यालय आहे**	गृह विभाग,पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई
५	**कार्यक्षेत्र**	पोलीस अधीक्षक पालघर आस्थापनेवरील ०४ उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालये व १६ पोलीस ठाणे

- प्रत्येक नागरिकाच्या सुरक्षिततेसाठी तसेच त्यांच्या न्याय हक्कांच्या रक्षणासाठी पोलीस अधीक्षक,पालघर पोलीस दल कटिबदध आहे.
- भिती किंवा प्रलोभनाचे बळी न पडता या देशाच्या कायदयांची कसोशीने अंमलबजावणी करण्याचा आमचा संकल्प आहे.
- "सद रक्षणाय खल निग्रहणाय" या महाराष्ट्राच्या ब्रीद वाक्याला स्मरूण आम्ही आम्ही समाजातील सद प्रवृत्तींचे रक्षण तसेच अपप्रवृत्तींवर अंकुश ठेवण्याचा सतत प्रयत्न करू.
- कायदे व नियंमाचं पालन करून आपण आमच्या या प्रयत्नांना साथ द्यावी ही विनंती. आपल्या एकत्रीत प्रयत्नां मधुन पालघर पोलीस दल समृध्द बनेल याची मला खात्री वाटते.
- पालघर पोलीस दल पोलीस कायदयाचे राज्य अबाधित राखीव,कायदयाची ठाम व निपक्ष्ज्ञपातीपणे अंमलबजावणी करील,प्रगती व समृधीसाठी पोषक असे भयमुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी कटीबदध राहील.
- सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी बांधील राहून गुन्हयाचा प्रतिबंध करून त्याचातत्परतेने शोध लावणे, जातीय सलोखा राखुन तो वृध्दीग करील आणि समाज विधातक प्रवृत्ती व अवैध कृती विरूध्द कठोर कारवाई करेल.
- आम्ही समाजातील सर्व घटकांची आणि विशेषत: दलित ,दुर्बल स्त्रियां,अल्पसंख्याक,बालके,गरीब आणि वंचीत घटकांची मनोभावे सेवा करू व त्यांना उचित संरक्षण प्रदान करून आपत्तीग्रस्त नागरीकांना सहृदयतेन तत्पर प्रतिसाद तात्काळ मदत देण्यास आम्ही बांधील आहोत.
- आम्ही आमचे वैयक्तीक जीवनात उच्च प्रतीचे सचोटीने आचरण करू पोलीस दलास भ्रष्टाचार मुक्त व पारदर्शी करण्यासाठी सतत प्रयत्नशिल राहू

❖ संरक्षित व सुखकर पालघर पोलीस दल हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू.

➢ **ध्येय धोरण**	❖ सदरक्षणाय खलनिग्रहणाय ❖ कायदा व सुव्यवस्था आबाधित राखणे ❖ शासनाने निर्धारित केलेले नियम / आदेश / सुचनांचे पालन करणे इत्यादी
➢ **साध्य**	❖ जनतेचे जिवीत व मालमत्तेचे संरक्षण करणे.
➢ **प्रत्यक्ष कार्य**	❖ शासनाने ठरवून दिलेले कामकाज ❖ कायदा व सुव्यवस्था राखणे ❖ सुरळीत वाहतूक ❖ गुन्हे प्रतिबंध,गुन्हे शोध सामाजिक सुरक्षा इत्यादी